# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**परिपत्रक क्र. १५/२०२४**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व प्रशासकीय शाखा, शैक्षणिक विभाग, विद्यापीठाने स्थापन केलेली व विद्यापीठाकडून चालविण्यात येणारी केंद्रे, प्रशाला किंवा परिसंस्था, विद्यापीठाचे विद्याविषयक सेवा युनिट, विद्यापीठाची सर्व अध्यासने आणि विद्यापीठ उप-परिसर केंद्रे यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अभिलेख (व्यवस्थापन, परिरक्षण, वर्गीकरण, जतन व नाशन) विनियम, २०२० यांस मा. व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिलेली असून सदर विनियम दिनांक २४ डिसेंबर, २०२० पासून लागू करण्यात आलेले आहेत. सदर विनियम विद्यापीठाच्या संकेतस्थळावर http://www.unipune.ac.in/pdf_files/law/Circular%20356_2020_28.122020.pdf येथे उपलब्ध आहेत.

उपरोक्त विनियम पारित करण्यामागील उद्दिष्टांपैकी कार्यालयातील अभिलेख व्यवस्थापनात सुसूत्रता येऊन अभिलेखांचे योग्यरितीने जतन केले जाणे, जेणेकरून अभिलेख संदर्भासाठी वेळीच उपलब्ध होतील हे एक उद्दिष्ट आहे. तसेच सदर विनियमातील नियम ११ हा 'ज्या प्रकरणामध्ये वाद चालू आहे त्या प्रकरणाशी संबंधित अभिलेख, यांचा जतन कालावधी संपुष्टात आला असला तरी संबंधित वाद निकाली निघेपर्यंत अभिलेख जतन करून ठेवावेत' असा आहे.

उपरोक्त विनियमातील तरतुदींच्या आधारे सर्व संबंधितांना असे निर्देश देण्यात येत आहेत की, जी प्रकरणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ खाली हाताळली जातात, त्यामधील समाविष्ठ अभिलेख (कागदपत्रे) प्रकरणाचा अंतिम निर्णय होईपर्यंत ज्या विभागाशी संबंधित माहिती मागितली आहे त्या विभागाने सुरक्षितपणे जतन करून ठेवावेत, अन्यथा होणाऱ्या परिणामास संबंधित अधिकारी/कर्मचारी जबाबदार राहतील.

23/1/2024

(प्रा. (डॉ.) विजय खरे)
प्रभारी कुलसचिव

**गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.**
**जा.क्र. - मा.अ./२०२४/९५३**
**दिनांक - २३/०१/२०२४.**